# मादी आणि स्त्री

विजया दीक्षित

भुपृष्ठाच्या समशीतोष्ण कटीबंधावरचे ते अतिप्राचीन अरण्य, सदाहरित घनदाट, अधूनमधून गवताळ सपाटी आणि पाण्याचे प्रवाह असणारे, वनवृक्षाची सळसळ, नागसापांचा वावर, चतुष्पाद प्राण्यांच्या आरोळया आणि रंगेबिरंगी पक्ष्यांच्या कूजनाने गजबजलेले. त्याच जंगलात दोन पायावर चालणारे, बिनशेपटीचे एप या प्राणीवर्गात मोडणारे प्राणीही बरेच होते. पुढे अनेक हजार वर्षांनी सर्व गोष्टींचे नामकरण करणारी भाषिक संस्कृती निर्माण झाली तेंव्हा याच प्राणिवर्गाच्या सुधारित आवृत्तीला नाव मिळाले ‘मानव’. त्याच जातीतली ती एक मादी. खरे म्हणजे आंगोपांगाची वाढ झाली असली तरी पुरेशी मादी नाहीच ती. ते एक पिल्लू होते. तेरा चौदा वर्ष वयाचे. कालपर्यंत आपल्या आईसोबत छोटया मोठया नर मादी भावंडासह रहात होते. आईने केलेल्या शिकारीचा वाटा खात होते. धाकटं खांद्यावर उचलून घेऊन आईमागे रानोमाळ भटकत होते, पण कालच आईमध्ये अकस्मात बदल झाला. ‘गच्च गच्च ... हिंस् हिंस्’ असे किंचाळत आई अंगावर धावून येऊ लागली. शिकारीचा वाटा देईना. स्वतःभोवती घोटाळू देत नव्हती. एवढेच नव्हे तर टोकदार नखांनी आईने तिचा चेहेरा ओरबाडला होता. त्यादिवशी आईचा तो देखणा उमदार नर काही काळ तिला न्याहळत बसला. एवढेच निमित्त झाले आणि तिचे पिल्लूपण संपले. ती जणू आईची प्रतिस्पर्धी झाली आणि त्या प्राणीजातीतल्या सबल, आक्रमक माद्या सवत कधीही खपवून घेत नसत.

आईने घेतलेल्या अकल्पित पवित्र्यामुळे ती हया वसंतातल्या प्रारंभीच्या उबदार सकाळच्या वनात उदासपणे एकटीच फिरते आहे. दिसेल ते फळ मूळ खात आहे. मंदपणे चालता चालता एका वृक्षाची खाली झुकलेली डहाळी तिने पकडली आणि चपळाई ने झोका घेऊन ती सहजपणे फांदीवर चढून पाय झुळवून बसून राहिली, पानांच्या फटीतून झिळमिळ उन पाझरत होते. तिच्या हातापायांवरची घनदाट लव चमचम करत होती. डोक्यावर पिवळया घोंगडीसारखे लांबलचक केस, तोंड उघडलं की पुढे धावणारे शुभ्र, तीक्ष्ण दात, पिंगट डोळे, रापलेला तांबूस चेहेरा, मान इकडे तिकडे चपळाईने फिरवत सतत सावधान राहण्याची माकडासारखी सवय... तरीही काही सुंदर, मधुर, नवे नवे थोडेसे तिला जाणवणारे, थोडेसे तिच्यापासुन उधळणारे... फांदीवर बसून संथ डोलत असताना तिला दिसला त्या झाडाच्या अगदी वरच्या फांदीवर पिकून पिवळा, केशरी झालेला छोटया छोटया फळांचा घोस. बहुधा हया उन्हाळयातला पहिलाच. मागच्या वर्षी तिने आणि तिच्या भावंडांनी रानभर धुमाकूळ घालत असली फळे खूप चरली होती. काही गोड, तर काही जिभेला शिरशिरी येईल इतकी आंबट. टपकणारी लाळ तिच्या जिवणीच्या कडेने ओघळली आणि ती विजेसारखी पळत, सरसरत फळांच्या त्या रसरशीत घोसापर्यंत क्षणात पोहोचली. हात पुढे करुन तो ती तोडणार एवढयात डाव्या बाजूने आवाज आला इ्ठिस्स्इ. त्या फांदीच्या रुंदट तळाशी हिरव्या पानांच्या शीतळाईत पहुडलेल्या एका मोठया भुजंगाने पिवळा धमक फणा उभारला

होता. ती निर्भयपणे पहात राहिली. तिला अनुभवाने माहित होते, हे काही अंगावर धावून येणारे आक्रमक जनावर नाही. स्पर्श झाला तर धोका असतो. हाताच्या पंज्याऐवजी त्याची पिवळा फणा जातीवंतपणाची वेलांटी लेऊन तशीच उभी होती. दुभंगल्या अंगाची काळया रेघेसारखी जीभ मुखातुन बाहेर येऊन लवलवत होती. तिला अचानक आठवला, भर दुपारच्या उन्हात तिला न्याहाळणारा तो आई चा बलवान उमदा नर. त्या नागाच्या डोळयात अनिवार आकर्षणाने तिने आपले डोळे मिसळले आणि स्पर्शासाठी उत्कट झालेला आपला हात त्या नागफणीच्या दिशेने उचलणार एवढयात मृत्यूची जाणीव सरसरत आतून मनाच्या पृष्ठभागावर आली आणि आत्मरक्षणाच्या सहज प्रेरणेने तिने नकळत धप्पकन खाली उडी मारली. आपण झाडावर कशासाठी चढलो होतो हे सुध्दा ती विसरली. तो लाल केशरी फळांचा घोस मात्र त्या फांदीवर तसाच झुलत राहिला.

मग निरुद्देश पावले उचलत ती चालू लागली. बरीचशी फलमूल तिने आधीच ओरबाडून खाल्ली असल्याने पोट शांत होतं. निदान एवढयातच अन्नासाठी धडपडण्याची गरज नव्हती. उबदार उन्हाळयात न्हाणारे ते रान मीलनोत्सुक पक्ष्यांच्या कूजनात नाचत होतं, भरगच्च पानांच्या हालचाली बरोबर अळुमाळ उन्ह धावपळ करीत होतं. कुठूनशी एका काळया पक्षाची आर्त तान आकाश भरून टाकत उठली. कुहूऽऽकुहू ऽऽ. तिला वाटले आपणही गाणं म्हणावं. तस गाणं, जे तिची आई नराला आकर्षित करण्यासाठी गाते. तसं गाणं, जे तिची आई आणि तिचा नर आपल्या मीलनोत्सवाच्या प्रारंभी म्हणतात. मग मान उंचावून आवाजाची उंची शक्य तेवढी वाढवून ती किन्नर कंठाने गाऊ लागली. 'होम्म ओम्म ऐं न्हीं क्लीम ओम्म ऐ...' सहजपणे तिचा स्वर आदितालाशी सुसंवादी झाला आणि रानावनातल्या त्या कोलाहलाशी समरस होऊन नदीजलासारखे तिचे गाणे वाहू लागले.

तान्हे भावंड चालू लागले, छातीशी बिलगून दूध पिईनासे झाले की, एक दिवस तिची आई उठायची. डोहाच्या पाण्यात डुबकी काढुन पेंगा काढत उन्हात अंग सुकवत बसायची. मग हाताला, पायाला, चेहेऱ्याला वनस्पतींचा लाल रंग फासून स्वतःला सजवायची. केसांची गाठ घालून त्यात रानफूले आणि नेच्याची पाने खोचायची. मग एकटीच तल्लीनपणे गाणं म्हणत रहायची, ओम, उम्म न्हां..., अशावेळी तिला आणि तिच्या भावंडांना आईची भितीच वाटायची. तेंव्हा मुळी ती आई नसायचीच. असायची ती एक आनखशिख मादी, निरोगी आणि सुंदर. अशावेळी भूक लागून एखादे तान्हे पारठे पोर आईच्या आसपास घोटाळलेच तर त्याची खैर नसायची. किंचाळून, ओरडून, मारून ती त्याला दूर पिटाळून द्यायची.

... आईचं गाणं थोडावेळ चाललं की त्या अनुरोधाने एखादा नर यायचा. कधी कधी दोन, तीनही. सोनेरी दाढी मिश्यांच्या जंजाळात चेहरे झाकलेले, छातीवर, हाता पायांवर घनदाट तांबूस लव असलेले, घमघमीत उग्र वासाचे ते बलवान नर. कोणी तरणाबांड, कोणी वयस्कर. आता आईचे गाणे थांबते आणि घशात गुरगुराट करीत ते नर एकमेकांचा अंदाज घेतात आणि धष्टपुष्ट एडक्यांसारखे एकमेकांना भिडतात. जमिनीवर रक्ताचे थारोळे साचवत लढतात. कधी नुसत्या अंगबळाने, तर कधी झाडांच्या फांद्यांनी, दगडांनी, शेवटी पराभूत नर मरतो, जखमी होतो, किंवा पळून जातो आणि आई अधोमूखाने विजयी नराच्या समोर जाऊन उभी राहते. शरणागत, समर्पित, जिंकलेपणाच्या उन्मादात किंचाळया मारत तो नर धावत जाऊन एखाद्या वणव्यातले अग्निकाष्ठ घेऊन येतो नि त्या अग्निभोवती फेर धरून नाचत ते नर-मादी मीलनाचे, सृजनाचे गाणे म्हणतात, ओम् उम् न्हां...

तेच गाणे म्हणत ती या जंगलात

तन्मयपणे चालली आहे. तिच्या मनात डुलतो आहे तो नाग, तो केशरी फळांचा घोस, गाण्याच्या अनुरोधाने आईकडे येणारे ते नर, वणव्याची उब , रानफुलांचे उग्र तिखट वास... चालता चालता ती त्या जंगलाबाहेर पडून पिवळया गवताने लहरणाऱ्या मोकळया सपाटीवर पोहोचली होती. मोरपिसाचा वारा गवताबरोबरच तिच्या देहावर हलकेसे तरंग उठवत होता आणि देहवीणा छेडल्यासारखे ते अनादि गाणे तिच्यातून उठत होते, 'ओम्म, होम्म...'

अचानक ते शांतीचे तळे डहुळले. पक्षी कोलाहल करत झाडावरुन भर्रकन उडाले. ससे, हरणे जीव घेऊन पळत सुटले. समोरुन लहान लहान टेकडया धावत सुटाव्यात तशी चार सहा हत्तींची झुंड सप् सप् गवत तुडवत रोरावत येत होती. अगदी तिच्याच दिशेने. ती क्षणभर हरणाइतकीच घाबरली आणि दिशा बदलून जीव घेऊन पळत सुटली. पळता पळता तिच्या लक्षात आलं, आपण आता सुरक्षित आहोत. कारण तिला अनुभव होता. हत्तीची झुंड अशी जोशात पळते तेंव्हा ती सहसा वळत नाही; सरळ रेषेतच धावते. हे लक्षात येऊनही ती पळतच राहिली आणि पळता पळता जिथे थांबली तो परिसर तिच्या आईच्या गुहेचा परिसर होता. आई म्हणजे सुरक्षा. तिच्या शरिरात अजुनही रेंगाळणाऱ्या पिल्लूपणाने तिला भयाच्या क्षणी नकळत इथेच आणून सोडलं. आई तिला सोडू इच्छित होती. पण ती मात्र आईला सोडू इच्छित नव्हती. कडेच्या टेकडीवर जरा उंचावर असलेल्या आईच्या गुहेत सामसूम होती. आई कदाचित पिल्लावळ घेऊन रानोमाळ शिकारीसाठी भटकत असेल, कदाचित पोरांना मोकळं सोडून आपल्या नव्या नरामागे फिरत असेल. तरीपण या क्षणी ती तिथे नव्हती. टेकडीच्या उतारावर चार सहा बकऱ्या आपल्या इवल्या इवल्या कोकरांसह बें बें करत गवत कुरतडत होत्या. आईनेच त्या आपल्या कुटुंबासाठी जंगलातुन पकडून आणून पाळल्या होत्या. टेकडीवर दाम दुपटीने उगवलेले हिरवेगार गवत खाऊन आंचळे दूधाने थबथबत असलेल्या त्या धष्टपुष्ट, देखण्या शेळया. मनात येईल तेंव्हा ती आणि तिची भावंडे शेळी पकडून तिचे आंचळ थेट तोंडातच पिळून घेत. अधून मधून आई पण ते उग्र वासाचे दूध प्यायची. आतासुध्दा तिने नेहमीसारखी एक पांढरीशुभ्र शेळी पकडली आणि आंचळास तोंड लावून ती दूध पिऊ लागली. शेळी सुखावल्यासारखी जागच्या जागी बें बें करत उभी राहिली. आई च्या अस्तिवाच्या भानासारखे ते सतत ओळखीचे दूध तिच्या ओठांवरून, जीभेवरून सुखाच्या संवेदना उठवत आत पाझरत राहिले. ती तल्लीन झाली, भान हरपली आणि एवढयातच शिकारीचे धूड खांद्यावर घेऊन आपल्या बछडयांसह आई परत आली. सगळे कुटंब पिकल्या गवतासारख्या सोनेरी लवेने दाटलेले आणि पितृत्वाची विविधता व्यक्त करणाऱ्या वेगवेगळया चेहऱ्या मोहऱ्यांचे. शेळीला बिलगलेल्या तिला असे पाठमोरे पाहून आईचे डोळे तांबरले. शिकारीचे धूड खांद्यावरून खाली टाकून तिने एक अणकुचीदार दगड उचलून घेतला नि हिंस...हिंस...हन्...हन् असे म्हणत आई धावली पण दूध पिण्यात गुंतलेल्या तिला मागची चाहूलसुध्दा लागली नव्हती. अचानकपणे वंशरक्षणाच्या सहज प्रेरणेने त्या आदिमातेस रोखले. ते तिचेच पिल्लू होते. ते दूध पित होते. अवतीभोवती एकही नर नव्हता. त्या आईच्या सृजनाच्या हक्कावर आक्रमण होण्याची शक्यता नव्हती. आई थबकली. तिला पोटभर दूध पिऊ दिले. मात्र शेळीला सोडून ती उभी राहताच आई धोंडा घेऊन तिच्या मागे लागली. 'गच्च...गच्च... गच्छ...हन्...हन्' असं ओरडत धोंडे फेकू लागली. चपळाईने तिने दगडांचा मारा चुकवला. पण ती तिथून पळून गेली नाही. थोडी दूर कोपऱ्यात उभी राहून शिकारीच्या धूडाकडे आशाळभूतपणे पाहू लागली. त्यात रोज तिचाही वाटा असतो. आता मात्र तिच्या लहान सहान भावंडांनीसुध्दा धोंडे उचलले. आईचा शत्रू तो आपला शत्रू हे त्यांना आपोआप

कळले होते. हिंस...हिंस...हन्...हन् असा आवाज काढत ते सर्व कुटुंब तिच्यावर धावले. आता मात्र तिला उमगलं, आता आपण पळालो नाही तर हे सगळे आपल्याला ठार मारतील. जसं मागच्या वर्षी तिच्या एका मोठया बहिणीला या कुटुंबाने ठार मारलं होतं आणि त्या हिंसेत ती स्वतःही आईच्या वतीने सामील झाली होती. धोंडयांचा मारा चुकवत ती धावू लागली, खूप दूर. त्या आईचा वावर असलेले ते जंगल, तो परिसर ओलांडून ती लांब निघून गेली...

आता तिची चाल मंदावली होती. मध्यान्हीचा सूर्य माथ्यावर आला होता. उन्हाचा त्रास चुकवण्यासाठी तिने मृदु पानांची हिरवी वेल अंगाभोवती वेढून घेतली. पानांच्या शीतल झिरमिळया अंगभर झुलत होत्या. तिला भूकही लागली होती. जबरजस्त भूक. फळामुळांनी न भागणारी. यापुढे तिला आई च्या शिकारीतला वाटा मिळणार नव्हता. तिची शिकार तिने स्वतः करायची होती. स्वतःसाठी गुहा शोधायची होती. स्वतःला सजवून त्या आदिम गीताने नराला आमंत्रण द्यायचे होते. मग तिची पिल्ले, तिचा परिसर, तिचे जंगल. दुसरी मादी तिथे प्रवेश करु शकणार नव्हती. नराचेही आक्रमण ती फक्त मीलनापुरतेच सहन करणार होती. एरवी नाही. एक स्वतंत्र, स्वछंद, सुंदर जीवन तिला आता सामोरे आले होते. चालता चालता तिने एक टोकदार दगड उचलून घेतला आणि दुरूनच गवतातून काही कुरतडुन खात बसलेल्या सशांच्या शुभ्र कळपाच्या रोखाने फेकला. छोटया छोटया झेपा टाकत तो चपळ कळप दृष्टीआड झाला, पण ज्याच्यावर नेम धरून तिने तो दगड फेकला होता तो ससा मात्र रक्त सांडत तिथेच पडला होता. धावत जाऊन तिने तो उचलला आणि दांत दाढांचा कचकच आवाज करत तिने तो चाटून पुसून खाल्ला. मग तृप्तीने जडावलेली पावलं टाकत, चालत जाऊन एका स्फटिकशुभ्र जळप्रवाहात रक्ताने रंगलेले ओठ लावून ती आकंठ पाणी प्यायली आणि अंगावरची वेलीची गुतवळ दूर करून तिने आपला देह पाण्यात झोकून दिला. खडकावर उन्हात बसून अंग ... आणि जटाभार सुकवताना तिच्या डोळयांवर झापड आली आणि अंग लोटून ती गाढ झोपून गेली...

तिसरा प्रहर ढळला तेंव्हा उन्हात आपल्या हातापायांच्या मृदू, सोनेरी लवेची चमचम पाहून ती हरखून उठली आणि उत्साहाने धावपळ करत पाण्याकाठच्या लालभडक चिखलाचे टिळे तिने आपल्या कपाळावर, दोन्ही गालांवर अलगद लावले. पुढून मागून झुळझुळत अंग झाकून टाकणारे पिवळे केस एकत्र करून डोक्याच्या मध्यभागी त्यांची ओबडधोबड गाठ घातली. गवताच्या तुऱ्यांनी, फुलांच्या डहाळयांनी केसात आरास केली आणि मग पाण्याला सन्मुख होऊन तिने प्रसन्नपणे उंच स्वरात आळवायला सुरवात केली. नराला आवाहन करणारे ते सृजनाचे शकुनगीत 'ओम्म...ऱ्हां...ऱ्ही...क्लीं होम्म हा हा हाई...'

आणि ते आले. एक नव्हे दोन नर, एकापेक्षा एक बलवान, तरणेबांड, सोनेरी लवेने, जटाभराने लवलवणारे, बांधेसूद, दाढी मिशांनी रूबाबदार दिसणारे. 'हम्...अहम्...अहम्...' असे गुरगुरत ते काही क्षण एकमेकांकडे रोखून पाहात थांबले. एकमेकांचा त्यांनी अंदाज घेतला आणि काही पावले मागे सरून एकाचवेळी मुसंडी मारत ते एकमेकांना भिडले. त्यांच्या युध्दाचा विषय असलेली ती डोळे विस्फारून, गाणे थांबवून उत्सुकतेने पाहात राहिली. ते खाली पडत होते. पुन्हा उठत होते. ठिणग्याच्या पावसासारखे लाल भडक धुळीचे वादळ उठवत, ज्वालांच्या लपेटयासारखे एकमेकांना भिडत होते आणि विजयी वीराचे पारितोषिक होती 'ती'. नवयौवनाने गजबजलेली एक सुंदर मादी, सामर्थ्याच्या भविष्यकालीन अस्तित्वाची हमी.

शेवटी युध्द संपले, रक्ताने माखलेल्या

विजयी नराने दोन्ही बाहू उंच उभारून विजयाची आरोळी ठोकली. 'जी...जी...जे...जय'. पराभूत नर त्याच्या पायाशी गलित जखमी अवस्थेत, अर्धवट बेशुध्दावस्थेत कण्हत होता. त्याच्याकडे ढुंकूनही न पाहता तो विजयी 'जै...जै...' असे ओरडत काही अंतरावर दूर जाऊन तिच्याकडे उत्सुक होऊन पाहू लागला. तो जिंकला होता. त्याच्या पौरुषावर भाळून आता तिने त्याला समर्पित व्हायला हवे होते. असेच आजपर्यंत घडत आले आहे. तिने क्षणभर त्या उन्मत्त विजयी नराकडे पाहिले. मग कण्हत पडलेल्या त्या जखमी नराकडे आणि भूकंप व्हावा तशी अचाानक पृथ्वीवर ती पहिलीच घटना घडली. त्या कोण्या अनामिकाच्या अद्‍भूत जाणत्या हातांनी प्राणीसृष्टीच्या विशाल विस्तारात एक विभाजक रेषा आखली. निःशब्दातून खणखणत एक विचार तिच्या मनात घुसला... हा माझ्यासाठी जखमी झाला...मरायला सिध्द झाला... हा दुर्बल आहे. याला माझी जास्त गरज आहे... आणि तिने आपला मोहरा वळवला. हळूहळू चालत ती त्या जखमी नराच्या डोक्याजवळ खाली बसली.

तो विजयी नर क्षणभर बावचळून गेला. हे अतर्क्य होते. अनूभवाच्या पलीकडचे होते. तो जिंकला तरीही ती नवथर मादी त्याच्या पौरुषाला शरण आली नाही. त्याचा स्वीकार तिने केला नाही. तो खिन्न झाला आणि पाठ फिरवून तो उमदा नरसिंह जड पावलांनी तिथून दूर गेला. बलवान असूनही तो काही करू शकत नव्हता. कारण अनिच्छा असलेल्या मादीवर बलात्कार करण्याचा कायदेशीर अधिकार त्याला देणाऱ्या समाज नावाच्या अदृश्य महापुरुषाचा जन्म व्हायला आणखी खूप हजार वर्षे अवकाश होता.

त्या पराभूत नराने डोळे उघडून चकितपणे पाहिले. पराभूत होऊनही ती त्याला प्राप्त झाली होती. का? कशामुळे? तो कुंठीत झाला होता. वारा थबकला होता. पाणी स्तब्ध होते. चंद्रसूर्यासहित आकाश आपले भ्रमण विसरले होते. ती पंचामहाभूतात्मक सृष्टी थक्क होऊन थांबली होती. कारण ती रडत होती. एका जिवंत प्राण्याची वेदना दुसऱ्या सजीवाला जाणवावी, अश्रू होऊन त्याच्या डोळयातून पाझरावी हे याआधी कधीच घडलेले नव्हते. आहार-निद्रा-भय-मैथुन या चतुर्मितीने बध्द असलेल्या प्राणीसृष्टीतल्या एका विशेष जातीत एक पाचवी मिती येऊन अलगद बिलगली. त्या मितीचे नाव 'करूणा'. रडतारडता तिच्या अंतर्यामात काही खोल हलत होते. प्रचंड घुसळण होत होती. काहीतरी रसायन तिच्या जीवनेच्छेत येऊन मिसळत होते. हलके हलके तिच्या मनाच्या पाण्यातून एक कमळ डोलत वर आले. त्यात बसली होती 'ती'... जगातली पहिली 'स्त्री'.

---

प्रिय वाचक,
मराठीतील दर्जेदार साहित्य आपल्यापर्यंत पोहोचवायचा आमचा हा प्रयत्न आहे. आपला अभिप्राय आम्हांस (marathikatha@gmail.com) व लेखिकेस जरुर कळवावा.

लेखिकेचा पत्ता
विजया दीक्षित
६, भक्तकुटीर, साकोरी,
ता. कोपरगाव, जि. अहमदनगर
PIN 423107

Copyright ©
सर्व हक्क लेखिकेकडे स्वाधीन. या कथेची soft copy आपण वापरु शकता. परंतु अन्य उपयोगासाठी लेखिकेची परवानगी आवश्यक आहे.
Document no m0300130004